जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २१९ | गुरुवार, ५ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### राज ठाकरेंच्या 'तटस्थ' भूमिकेमुळे ठाकरे गटाची कोंडी

**मुंबई, ता. ४ :** राज्याच्या राजकारणात 'ठाकरे बंधूंमधील संघर्ष' नवा नाही, पण मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग समिती निवडणुकीने या वादाला फोडणी दिली आहे. प्रभाग समिती अध्यक्षपदासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असतानाच, मनसेने या निवडणुकीत 'तटस्थ' राहण्याचा धक्कादायक निर्णय घेतला आहे. उद्धव ठाकरेंनी पाठवलेला मैत्रीचा प्रस्ताव राज ठाकरेंनी फेटाळून लावल्याने ठाकरे गटाच्या (शिवसेना उबाठा) गोटात मोठी अस्वस्थता पसरली आहे. संख्याबळानुसार, प्रत्येक मत निर्णायक आहे. मनसेचे नगरसेवक तटस्थ राहिल्याने बहुमताचा आकडा गाठताना शिवसेना (उबाठा) ची दमछाक होणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मनसेने स्वीकृत नगरसेवक पदासाठी ठाकरे गटाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. राजकीय गणिते जुळवण्यासाठी पडद्यामागे चर्चाही झाल्या. मात्र, ऐनवेळी ठाकरे गटाने मनसेच्या पारड्यात काहीही न टाकल्याने राज ठाकरे नाराज झाले. त्यामुळे राज ठाकरेंनी मदत केली नाही, तर पाठिंबाही नाही अशी स्पष्ट भूमिका घेत मैत्रीचा प्रस्ताव धुडकावून लावला.

# मुळा-मुठा नदी प्रदूषणाविरोधात लोणी काळभोर येथील 'एमआयटी'च्या विद्यार्थ्यांचा एल्गार

## नदीपात्रात अवैध कचरा टाकण्याविरोधात विद्यापीठ प्रवेशद्वारावर आंदोलन

**लोणी-काळभोर, ता. ४ :** पुणे शहराची जीवनवाहिनी असणाऱ्या मुळा-मुठा नदीपात्रात कुठलीही प्रक्रिया न करता अवैधरित्या टाकण्यात येणारा कचरा त्वरित बंद करावा, या मागणीसाठी एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एडीटी) शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर तीव्र निदर्शने केली.




या आंदोलनात शैक्षणिक संकुलातील एमआयटी विश्वशांती गुरुकुल, एमआयटी ज्युनिअर महाविद्यालय व एमआयटी एडीटी विद्यापीठातील हजारो विद्यार्थी व निवासी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. यावेळी सर्वांनी या विषयाची गंभीरता, भविष्यातील संभाव्य धोके, मुळा- मुठा नदीचे अस्तित्व, परिसरातील पर्यावरणाबाबत स्थानिक ग्रामपंचायतींची उदासीनता तसेच स्थानिक व जिल्हा प्रशासनाकडून या अत्यंत गंभीर प्रश्नाकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष यांच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी केली. तसेच विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाला नदीत कुठलीही प्रक्रिया न करता दररोज टाकला जाणारा ३५ ते ४० ट्रॅक्टर कचरा तातडीने थांबविण्याची तसेच विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावरच सदर वाहने आडविण्याची विनंती केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनासह स्थानिक पोलिसांनाही याबाबत पत्र दिले.

नुकतीच नदीपात्रात टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यांच्या ढिगाऱ्यांना २६ फेब्रुवारी २०२६ रोजी भयंकर आग लागली, जी पुढील तब्बल चार दिवस धुमसत राहिली. त्यामुळे परिसरात प्रचंड विषारी धुराचे लोट पाहायला मिळाले. यामुळे २७ फेब्रुवारी रोजी एमआयटी एडीटी शैक्षणिक संकुलातील ६७ विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊन गुदमरल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले. या आगीमुळे व धुरामुळे शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी, स्थायी कर्मचारी व परिसरातील नागरिकांना श्वसनाचा गंभीर त्रास झाला. नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला लागलेली आग पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा एकमेव बंब आणि एमआयटी एडीटी विद्यापीठातील २५३० कर्मचाऱ्यांनी पाच दिवस प्रयत्नांची पराकाष्ठा करून मंगळवारी (२ मार्च) विझवली. मात्र लागलेल्या या आगीमुळे चार दिवस परिसरात विषारी धुराचे प्रचंड लोट जमा झाले. यामुळे वसतिगृहातील तसेच परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होणे, डोळ्यांची जळजळ होणे, घसा बसणे इत्यादी त्रास झाला. तसेच शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांना विषारी धुरामुळे शुक्रवारी मध्यरात्री अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले होते.

एमआयटी शैक्षणिक संकुलात सध्या राज्यासह देश-विदेशातून आलेले २० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी जवळपास ५ हजार विद्यार्थी व १ हजार कर्मचारी शैक्षणिक संकुलाच्या परिसरात वास्तव्यास आहेत. त्यामुळे, प्रशासनाने लवकरात-लवकर या गंभीर विषयाची दखल घेत, तातडीने नदीपात्रात कचरा टाकणे थांबवावे अशी, आग्रही मागणी विद्यार्थ्यांनी यावेळी केली.

## आग व विषारी धुरामुळे आरोग्य धोक्यात

पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात थेट कचरा टाकणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. नदीपात्रात कचऱ्याचे डोंगर उभे असून त्यास सातत्याने आग लागण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे विषारी धुराचे लोट तयार होऊन आम्हा विद्यार्थ्यांना श्वसनाच्या समस्या जाणवत आहेत. जिल्हा प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने हस्तक्षेप करावा. नदीपात्रात अवैधरित्या थेट कचरा टाकणे त्वरित थांबवावे. विद्यार्थी व परिसरातील नागरिकांच्या चांगल्या आरोग्यासाठी स्थानिक ग्रामपंचायतींच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने जागा उपलब्ध करून द्यावी.
- **मुग्धा सोनवणे,** विद्यार्थीनी


गेल्या काही वर्षांपासून स्थानिक लोणी-काळभोर, कदमवाकवस्ती व इतर काही जवळच्या गावांकडून थेट मुळा-मुठा नदीपात्रात अवैधरित्या व कुठलीही प्रक्रिया न करता रोज तब्बल ३५ ते ४० ट्रॅक्टर कचरा टाकला जातो. नदीपात्रात आता कचऱ्याचे ढीग तयार झाले आहेत. यामुळे केवळ वायुप्रदूषणच नव्हे तर जलप्रदूषणही वाढत असून मुळा-मुठा नदीचे पाणी प्रचंड दूषित होवून जलचरांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला आहे. नदीपात्रातील कचऱ्यामुळे निर्माण होणारे प्रदूषण, दुर्गंधी इत्यादींमुळे पुणे शहराची तसेच महाराष्ट्राची प्रतिमाही मलीन होत आहे.
- **दादासाहेब भोसूरे,** विद्यार्थी प्रतिनिधी

मुळा-मुठा नदीच्या सानिध्यात असणारा आमचा एमआयटी एडीटी विद्यापीठाचा परिसर अतिशय निसर्गसंपन्न आहे. मात्र स्थानिक ग्राम पंचायतींकडून कुठलीही प्रक्रिया न करता टाकण्यात येणाऱ्या या कचऱ्या मुळे नदीचे पाणी अतिशय घाण झाले आहे. त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत आहे. कचऱ्याला सातत्याने लागणाऱ्या आगींमुळे वायू प्रदूषण वाढले असून नुकतेच महाराष्ट्र प्रदूषण मंडळाकडून येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक तब्बल इतकी गंभीर नोंदविण्यात आली. या कचऱ्यामुळे परिसरातील लोकांचे आरोग्य धोक्यात आल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कारवाई करावी.
- **अनय अहिरे,** विद्यार्थी

मुळा-मुठा नदीपात्रात थेट टाकला जाणारा कचरा, त्याला सातत्याने लागणाऱ्या आगी, त्यातून निघणारा प्रचंड विषारी धूर आणि त्यामुळे होणारा श्वसनाचा त्रास या घटनांबाबत एमआयटी एडीटी शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. त्यातून विद्यार्थ्यांनी आज विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर तीव्र आंदोलन केले. या आंदोलनातून नदीपात्रात थेट टाकला जाणारा कचरा तातडीने थांबविण्यात यावा, असा ठाम सूर उमटला. विद्यार्थ्यांनी तीव्र भूमिका घेत विद्यापीठातून नदीकडे जाणारे कचऱ्याचे सर्व ट्रॅक्टर पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने प्रवेशद्वारावरच आडविण्याचा निर्णय जाहीर केला.
- **डॉ. महेश चोपडे,** कुलसचिव, एमआयटी एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे

# रामेश्वर कॅफेवर महापालिकेने फिरवला बुलडोझर

**पुणे, ता. ४ :** पुणे शहरातील विमाननगर परिसरात सुरू झालेल्या द रामेश्वर कॅफेवर पुणे महानगरपालिकेने कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. दुकानासमोरील सार्वजनिक जागेचा अनधिकृत वापर केल्याच्या तक्रारी गेल्या काही दिवसांपासून स्थानिकांकडून केल्या जात होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिकेने संबंधित ठिकाणी कारवाई करत कॅफेसमोरील बसण्याची व्यवस्था हटवली.




द रामेश्वर कॅफेची सुरुवात डिसेंबर २०२५ मध्ये विमाननगर भागात झाली होती. बंगळुरू येथील ही प्रसिद्ध कॅफे असून पुण्यात शाखा सुरू झाल्यानंतर खाद्यप्रेमींमध्ये उत्साह पाहायला मिळाला होता. दाक्षिणात्य पदार्थांसाठी ओळखल्या जाणाऱ्या या कॅफेमध्ये दररोज मोठी गर्दी होत असल्याचे दिसून येत होते. मात्र कॅफेकडून दुकानासमोरील फ्रंट मार्जिनचा वापर करून अतिरिक्त बसण्याची व्यवस्था करण्यात आल्याची चर्चा होती.

स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक जागा अडवली जात असल्याची तक्रार महापालिकेकडे केली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पाहणी करून नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्याने कारवाई केली. कॅफेसमोर उभारण्यात आलेली तात्पुरती रचना काढून टाकण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार सुमारे ६५०० चौरस फुट परिसरातील अनधिकृत बांधकामावर तोडफोड करण्यात आली आहे. कॅफेसुरू होऊन अवघ्या २ ते ३ महिन्यांतच ही कारवाई करण्यात आल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे. सार्वजनिक जागांचा वापर नियमांनुसारच व्हावा, असे मत काही नागरिकांनी व्यक्त केले आहे. महापालिकेकडून पुढील तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# खेड येथील अपघातात विवाहितेचा जागीच मृत्यू

**पुणे, ता. ४ :** वराळे येथून अमेठाण गावाकडे दुचाकीवरून जात असताना ट्रकने दुचाकीला धडक दिल्याची घटना घडली आहे. ही घटना वराळे (ता. खेड) गावाजवळ रविवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातात वर्षीय विवाहित महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर तिचा पती आणि चार वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिलेचे नाव लक्ष्मी सिद्रायम्मा स्वामी (वय २४) असे आहे. तिचे पती सिद्रामय्या स्वामी (वय ३२) आणि मुलगा श्रेयश (वय ४) हे जखमी झाले असून त्यांना तातडीने जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हे कुटुंब वराळे येथून अमेठाण गावाकडे दुचाकीवरून निघाले होते. दरम्यान, ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात




भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर तिघेही रस्त्यावर फेकले गेले. त्यानंतर ट्रक महिलेच्या अंगावरून गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला, अशी प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, या अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळी न थांबता फरार झाला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले असून आरोपी चालकाचा शोध सुरू आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# लोणी काळभोर पोलिसांचा हातभट्टी दारू विक्रीच्या अड्ड्यावर छापा

**लोणी काळभोर, ता. ४ :** हातभट्टी दारू विक्रीच्या अड्ड्यावर लोणी काळभोर पोलिसांनी कदम वाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कवडीमाळवाडी परिसरात मंगळवारी (ता. ३) सकाळी साडे नऊ वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. या छाप्यात पोलिसांनी तीन जणांना अटक करून सुमारे १५ लिटर हातभट्टी दारू जप्त केली आहे.





अक्षय बजरंग मुळेकर (वय-२५, मंदा बजरंग मुळेकर (वय-४५, दोघेही रा. हनुमान मंदीराजवळ, कवडी माळवाडी, दत्तपार्क, कदम वाकवस्ती ता. हवेली जि पुणे) व राहूल बाळकृष्ण तावरे (वय-४६, रा. भेकराईनगर, लेन नं.२ . फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस हवालदार संतोष रावसाहेब तांदळे (वय-४६) यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कवडी माळवाडी येथील पत्र्याच्या शेडच्या आडबाजूस दोन पुरूष व एक महीला तयार हातभट्टी गावठी दारु जवळ बाळगून चोरुन लपुन विक्री करत आहे. अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला असता, वरील तिन्ही आरोपी हातभट्टी दारू विक्री करताना आढळून आले.

पोलिसांनी आरोपींच्या कब्जातून १ हजार ९०० रुपयांची १५ लीटर गावठी हातभट्टी दारु असा मुद्देमाल जप्त केला आहे. तर लोणी काळभोर पोलिस ठाण्यात तिघांच्या विरोधात महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. ही कामगिरी लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नाळे, पोलीस हवालदार रामहरी वणवे, संतोष तांदळे, प्रदीप गाडे, संदीप जोगदंड व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

# शिरूरमध्ये महिलेने अनेकांना घातला कोट्यवधींचा गंडा

**शिरूर, ता. ४ :** कायद्याचे रक्षकच गुन्हेगारांच्या जाळ्यात असून शिरूर तालुक्यात सध्या अशाच एका प्रकरणाने खळबळ उडवून दिली आहे. 'विश्वासार्ह भिसी' योजनेच्या नावाखाली एका महिलेने चक्क पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाच लाखो रुपयांचा गंडा घातला असून, या फसवणुकीचा आकडा कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे.

काही महिन्यांपूर्वी शिरूरमधील एका महिलेने स्थानिक पोलीस कर्मचाऱ्यांशी जवळीक साधून एक 'प्रायव्हेट भिसी' योजना सुरू केली. सुरुवातीला काही पोलिसांना वेळेवर परतावा देऊन तिने मोठी विश्वासार्हता निर्माण केली. पोलीस दलात ही चर्चा इतकी पसरली की, केवळ शिपाईच नाही तर पोलीस उपनिरीक्षक आणि पोलीस निरीक्षकांनीही यात पैसे गुंतवले. काहींनी स्वतःची बचत, तर काहींनी चक्क कर्ज काढून या योजनेत रक्कम भरली.




सुरुवातीला सुरळीत चाललेला हा व्यवहार अचानक थांबला. नियमित हप्ते भरूनही जेव्हा परताव्याची वेळ आली, तेव्हा संबंधित महिलेने टाळाटाळ सुरू केली. आता पैसे बुडाल्याचे लक्षात येताच पोलीस दलात मोठी कुजबुज सुरू आहे, पण कुणीही उघडपणे बोलायला तयार नाही.

या प्रकरणात अनेक पोलीस कर्मचारी मौन बाळगून आहेत. पोलीस असूनही आमची फसवणूक झाली हे सांगताना होणारी नाचक्की आणि कायदेशीर पुराव्यांचा अभाव यामुळे 'खाकी' आज हतबल झाली आहे. दरम्यान, याप्रकरणी पुढे काय कारवाई होणार ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# पुण्यात रुग्णवाहिकेच्या पाठीमागे वाहनांच्या रांगा; वेळ वाचवण्याच्या नादात जीव धोक्यात!

**पुणे, ता. ४ :** वाढती वाहनसंख्या, सततची वाहतूक कोंडी आणि कामावर वेळेत पोहोचण्याची घाई, या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर पुण्यासह राज्यात एक अत्यंत धोकादायक प्रवृत्ती डोके वर काढताना दिसत आहे. रुग्णवाहिकेला मार्ग देण्याऐवजी तिच्याच पाठीमागे चारचाकी व दुचाकींच्या रांगा लावून भरधाव वेगाने पुढे जाण्याचे प्रकार वाढले आहेत. काही मिनिटांचा वेळ वाचवण्यासाठी घेतलेला हा शॉर्टकट जीवघेणा ठरू शकतो, याची जाणीव मात्र कमीच दिसते.

पुण्यातून पुणे-सोलापूर, नाशिक, अहिल्यानगर, सातारा आणि मुंबई हे प्रमुख महामार्ग जातात. याशिवाय सासवड आणि मुळशीकडे जाणारे राज्यमार्गही मोठ्या प्रमाणात वाहनांनी गजबजलेले असतात. सकाळ-संध्याकाळची कोंडी ही आता नित्याची बाब झाली आहे. अशा वेळी सायरन वाजवत जीव वाचवण्यासाठी धावणाऱ्या रुग्णवाहिकेला बाजू देताना काही चालक तिच्या मागेच सरकून स्वतःचा मार्ग मोकळा करून घेतात. ही प्रवृत्ती केवळ बेजबाबदार नाही, तर अत्यंत धोकादायक आहे.

रुग्णवाहिका अचानक ब्रेक लावल्यास किंवा वळण घेतल्यास मागील वाहनांची धडक होण्याची शक्यता प्रचंड असते. वेग, कमी अंतर आणि घाई या त्रिसूत्रीमुळे अपघाताचा धोका अनेकपटींनी वाढतो. त्याहूनही गंभीर बाब म्हणजे रुग्णवाहिकेला मोकळी जागा न मिळाल्यास रुग्णाच्या




उपचारात विलंब होतो. आणि तो विलंब जीवघेणा ठरू शकतो. वाहतुकीचे नियम रुग्णवाहिकेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे सांगतात. तिच्या पाठीमागे वेगाने जाण्याची परवानगी देत नाहीत. तरीही काही चालक नियमांची पायमल्ली करून स्वतःच्या सोयीसाठी इतरांच्या जीवाशी खेळ करताना दिसतात. ही मानसिकता बदलणे अत्यावश्यक आहे.

दरम्यान, जनजागृती मोहीम राबवून नागरिकांना या धोकादायक प्रवृत्तीचे परिणाम समजावून सांगितले पाहिजेत. रुग्णवाहिकेला सुरक्षित आणि मोकळा मार्ग मिळणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. भविष्यातील मोठी दुर्घटना टाळायची असेल, तर आजच कठोर पावले उचलावी लागतील. कारण वेळ वाचवण्याच्या नादात जर एखादा जीव गेला, तर त्याची भरपाई कोण करणार? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होते आहे.

**संयम हाच खरा उपाय**

काही क्षणांची घाई आयुष्यभराच्या पश्चात्तापाचे कारण बनू शकते. रुग्णवाहिका म्हणजे कोणाचातरी शेवटचा आशेचा किरण असतो. तिच्या पाठीमागे धावणे म्हणजे त्या आशेवरच गदा आणणे होय. सुरक्षित अंतर ठेवणे, सिग्नल पाळणे आणि रुग्णवाहिकेला पूर्ण मार्ग मोकळा करून देणे. ही प्रत्येक चालकाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. खरी सामाजिक जाणीव म्हणजे दुसऱ्याच्या जीवाला प्राधान्य देणे.

### पोलीस प्रशासनाने कडक कारवाई करावी

रुग्णवाहिकेच्या पाठीमागे भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे मोठ्या अपघाताचा धोका निर्माण होत आहे. काही मिनिटांचा वेळ वाचवण्यासाठी नियमांची उघड पायमल्ली केली जात आहे. अशा नियमभंग करणाऱ्या चालकांवर तात्काळ दंडात्मक तसेच कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. प्रमुख महामार्ग आणि शहरातील चौकांमध्ये विशेष तपासणी मोहीम राबवून सीसीटीव्हीच्या माध्यमातून दोषींना ओळखून त्यांच्यावर कडक कारवाई करणे गरजेचे आहे.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त

### पुण्यात ज्येष्ठ वकिलाची १४.२५ कोटी रुपयांची फसवणूक

**पुणे, ता. ४ :** पुण्यात सायबर गुन्हेगारीने एका ६८ वर्षीय ज्येष्ठ वकिलाला शेअर बाजारात मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून तब्बल १४ कोटी २५ लाख ६५ हजार रुपये लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या फसवणुकीची सुरुवात एका साध्या मेसेज किंवा सोशल मीडिया लिंकवरून झाली. चोरट्यांनी स्वतःला शेअर बाजार तज्ज्ञ भासवून वकिलांशी संपर्क साधला. त्यांना एका विशिष्ट 'इन्व्हेस्टमेंट प्लॅटफॉर्म'वर गुंतवणूक केल्यास अल्पावधीत दुप्पट-तिप्पट नफा मिळेल, असे स्वप्न दाखवले होते. दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, सुरुवातीला विश्वास संपादन करण्यासाठी आभासी नफा दाखवण्यात आला. याच नफ्याच्या मोहात पडून वकिलांनी आपली आयुष्यभराची पुंजी आरोपींच्या खात्यात जमा केली. जेव्हा त्यांनी पैसे काढण्याचा प्रयत्न केला, तेव्हा चोरट्यांनी 'टॅक्स' किंवा 'प्रोसेसिंग फी'च्या नावाखाली अधिक पैशांची मागणी केली आणि अखेर संपर्क तोडला. दरम्यान, वकिलाला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### सोन्याच्या दरात मोठी घसरण!

**मुंबई, ता. ४ :** जागतिक बाजारपेठेत सोन्याच्या किमतीने सोमवारी ५,४१९ डॉलरचा ऐतिहासिक उच्चांक गाठल्यानंतर, मंगळवारी (३ मार्च २०२६) मात्र यात मोठी घसरण पाहायला मिळाली. युद्धाची भीती काहीशी ओसरल्याने आणि अमेरिकन अर्थव्यवस्थेतील कडक संकेतांमुळे सोन्याचे दर प्रति औंस ५,०७४ डॉलरपर्यंत खाली आले आहेत. भारतीय रुपयाचा विचार करता, जागतिक बाजारातील ही घसरण स्थानिक स्तरावरही सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम सुमारे २,००० ते २,५०० रुपयांची कपात करू शकते. गेल्या काही दिवसांपासून अमेरिका, इराण आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्षामुळे सोन्याच्या किमतीत वाढ पाहायला मिळत होता.अमेरिकेतील मॅन्युफॅक्चरिंग डेटा अपेक्षेपेक्षा जास्त आल्याने महागाई लवकर आटोक्यात येणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. यामुळे सोन्यावरील दबाव वाढला. ५,४२० डॉलरच्या पातळीवर पोहोचताच मोठ्या प्रमाणात 'ऑटोमेटेड सेल ऑर्डर्स' ट्रिगर झाल्या, ज्यामुळे किमती वेगाने खाली आल्या.

### सोने खरेदीसाठी ग्राहकांची लगबग सुरु

**मुंबई, ता. ४ :** सध्या इस्त्रायल, इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाने केवळ भूराजकीय तणावच वाढवला नाही, तर जागतिक अर्थव्यवस्थेची गणितेही पूर्णपणे बदलून टाकली आहेत. मध्यपूर्वेतील युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून जागतिक चलनांमध्ये मोठी घसरण पाहायला मिळत आहे. अशा अनिश्चिततेच्या वातावरणात जेव्हा चलनाची किंमत कमी होते, तेव्हा सोन्याचे मूल्य स्थिर राहते किंवा वाढते. म्हणूनच, जगभरातील मोठ्या बँका आणि गुंतवणूकदार सध्या सोन्याची साठवणूक करण्यावर भर देत आहेत. पुढील पाच वर्षांत सोन्याचे दर सध्याच्या तुलनेत दुप्पट होऊन १०,००० डॉलर्स (भारतीय चलनानुसार साधारण  लाख रुपये प्रति तोळा) पर्यंत पोहोचू शकतात. चीन, भारत आणि रशियासारख्या देशांच्या मध्यवर्ती बँका डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सोन्याचा साठा वाढवत आहेत. सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबासाठी सोने हे केवळ दागिन्यापुरते मर्यादित नसून ते एक 'इमर्जन्सी फंड' असते. जर खरोखरच सोन्याचे भाव ३ लाखांपर्यंत गेले, तर आज केलेली गुंतवणूक भविष्यात फायद्याची ठरले.



### शिवजयंतीची परवानगी नाकारल्याने विद्यार्थ्यांचे महाविद्यालयासमोर आंदोलन

पुणे, ता. ४ : पुणे शहरातील एच. व्ही. देसाई महाविद्यालयाबाहेर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. महाविद्यालय प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यासाठी परवानगी नाकारल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरली असून त्यांनी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर जमून घोषणाबाजी केली. शनिवार वाडा परिसरातील या महाविद्यालयाबाहेर विद्यार्थ्यांनी प्रशासनाविरोधात निषेध व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराज हे प्रेरणादायी ऐतिहासिक व्यक्तिमत्व असून त्यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यास परवानगी का दिली जात नाही, असा सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. महाविद्यालयाच्या आवारात कार्यक्रम घेण्याची विनंती केली होती, मात्र ती मान्य करण्यात आली नसल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.परवानगी नाकारल्यानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांनी महाविद्यालयाबाहेर शांततापूर्ण आंदोलन करत प्रशासनाकडून स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी केली. या प्रकरणामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# अपघातात २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू; ठेकेदार-प्रशासनावर कारवाईची मागणी

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. ४ : बारामती पालखी महामार्गावर तरंगवाडी हद्दीतील वेताळ मंदिरासमोर झालेल्या अपघातात २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या घटनेनंतर बुधवारी (दि. ४ मार्च) सकाळी साडेनऊ ते पावणे अकरा या वेळेत स्थानिक नागरिकांनी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत प्रशासनाचा निषेध नोंदवला.



संदीपकुमार इंदल राम (वय २३, मूळ रा. श्रीपुर नवादा, राजेपूर खादा, पूर्वी चंपारण, बिहार; सध्या रा. सोनाई डेरी जवळ, निमगाव केतकी, ता. इंदापूर) हे मंगळवारी (दि. ४ मार्च) रात्री सुमारे आठ वाजता दुचाकीवरून प्रवास करत असताना वेताळ मंदिरासमोरील अपूर्ण रस्त्यावर अपघातग्रस्त झाले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. याच ठिकाणी यापूर्वीही अनेक अपघात झाले असून निष्पाप नागरिकांचा बळी गेला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

आंदोलना दरम्यान महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. वाहनांच्या रांगा लागल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांनी घटनास्थळी येऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली व निवेदन स्वीकारले. संबंधित विभाग, ठेकेदार आणि ग्रामस्थांची संयुक्त बैठक गुरुवारी तहसील कार्यालयात घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी अजिंक्य जावीर, ॲड. सचिन राऊत तसेच सरस्वतीनगर, तरंगवाडी, गोखळी आदी भागांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंदापूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शैलेश पवार उर्फ बाळासाहेब ढवळे यांनी सांगितले की, वेताळ मंदिरासमोरील रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण असून त्यामुळेच वारंवार अपघात होत आहेत. आतापर्यंत २५ हून अधिक जणांचा बळी गेल्याचा दावा त्यांनी केला. संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून मृतांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते डॉ. शशिकांत तरंगे यांनीही प्रशासनावर टीका करत सांगितले की, तरंगवाडी ते इंदापूरदरम्यान सर्विस रस्ता नसल्याने धोका वाढला आहे. अवजड वाहनांची वर्दळ, औद्योगिक क्षेत्रातील टँकर वाहतूक आणि शैक्षणिक संस्थांमुळे वाढलेली रहदारी लक्षात घेता तातडीने रस्त्याची कामे पूर्ण करावीत, अन्यथा व्यापक आंदोलन उभारले जाईल.

दरम्यान, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी मार्गावरील अपूर्ण कामे त्वरीत पूर्ण करून भविष्यातील अपघात टाळावेत, अशी एकमुखी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### पुण्यात पत्नीनेच पतीला दिली 'पोटगी'

**पुणे, ता. ४ :** सामान्यतः घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये पतीला पत्नीला पोटगी द्यावी लागते, हे आपण ऐकतो. पण पुण्यातून एक अशी बातमी समोर आली आहे, जिने कायदेशीर क्षेत्रासह सामाजिक वर्तुळातही सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. चक्क एका पत्नीने आपल्या पतीला घटस्फोटाच्या बदल्यात ५० हजार रुपये 'खटला खर्च' म्हणून दिले आणि अधिकृतपणे घटस्फोट घेतला. पुण्याच्या एकाच गल्लीत राहणाऱ्या एका तरुण-तरुणीने घरच्यांचा विरोध पत्करून १९ एप्रिल २०२४ रोजी विशेष विवाह कायद्यांतर्गत 'कोर्ट मॅरेज' केले. मात्र, लग्नानंतर आर्थिक ओढताण आणि वेगळे राहण्याचा खर्च पेलणे या जोडप्याला कठीण जाऊ लागले. शेवटी तरुणीने आपल्या घरी लग्नाची कबुली दिली, जिथे तिला विरोधाचा सामना करावा लागला. तरुण आपल्या पत्नीला नांदवायला तयार होता, पण कुटुंबाच्या दबावाखाली आलेल्या तरुणीने माघार घेण्याचे ठरवले. प्रकरण कौटुंबिक न्यायालयात गेले. पतीने आपली कोणतीही चूक नसताना कोर्टात खेचले गेल्याची भूमिका घेतली.

## तुकाराम बीजेनिमित्त होणाऱ्या धार्मिक सोहळ्यासाठी पुणे-पिंपरीतून देहूसाठी जादा बसेस सुटणार

**पुणे, ता. ४ :** संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांच्या तुकाराम बीजेनिमित्त देहूगावमध्ये होणाऱ्या धार्मिक सोहळ्यासाठी यंदाही राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविक दाखल होणार आहेत. ही वाढती गर्दी लक्षात घेऊन पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडने (पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड) ४ ते ६ मार्चदरम्यान देहूगावकडे अतिरिक्त बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे या जादा बसफेऱ्यांसाठी कोणताही वेगळा दर आकारला जाणार नसून, नियमित तिकीट दरातच ही सेवा उपलब्ध असेल.



देहू हे संत तुकाराम महाराजांचे जन्मस्थान असून तुकाराम बीजेला येथे कीर्तन, भजन, प्रवचन आणि विविध धार्मिक कार्यक्रम होतात. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील उपनगरांतून भाविक मोठ्या संख्येने देहूगावात येतात. दरवर्षी होणारी गर्दी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पीएमपीएमएलकडून यंदा आधीच नियोजन करण्यात आले आहे.

४ मार्च रोजी स्वारगेट, मनपा भवन, पुणे स्टेशन आणि आळंदी येथून देहूगावसाठी एकूण ३५ जादा बस सोडण्यात येणार आहेत. या बस सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रांत उपलब्ध राहतील. ५ मार्च रोजी, म्हणजेच तुकाराम बीजेच्या मुख्य दिवशी, सर्वाधिक २०७ जादा बसफेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. या बस स्वारगेट, मनपा भवन, निगडी, पुणे स्टेशन, देहूरोड स्टेशन आणि आळंदी येथून धावणार आहेत. त्यापैकी ११६ बस सकाळच्या सत्रात, तर ९९ बस दुपारच्या सत्रात असतील. भाविकांच्या परतीच्या प्रवासासाठी देहूगावातील वैद्यकीय इंडे मळा परिसरातील सैनिकी मैदानावर तात्पुरता बसथांबा उभारण्यात आला आहे. तसेच देहू-आळंदी दरम्यान प्रवासासाठी संत तुकाराम महाराज क्रीडांगणाजवळील मोकळ्या जागेतून विशेष बसफेऱ्या चालवण्यात येणार आहेत.

ही व्यवस्था केवळ सोयीसाठीच नाही, तर खासगी वाहनांमुळे होणारी वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका कमी करण्यासाठीही महत्त्वाची आहे. भाविकांनी शक्यतो पीएमपीएमएलच्या बससेवेचा वापर करून शिस्तबद्ध, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवास करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांची 'नो कॉम्प्रमाइज' भूमिका

**तेहरान, ता. ४ :** मध्यपूर्वेत काही दिवसांपासून रणसंग्राम सुरु आहे. गेल्या काही दिवसांत अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या भीषण हल्ल्यांनंतर इराणने प्रथमच चर्चेचे संकेत दिले आहेत. मात्र, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अत्यंत कडक शब्दांत चर्चेचे निमंत्रण फेटाळून लावल्याने जगाची धाकधूक वाढली आहे. गेल्या ४७ वर्षांपासून अमेरिका आणि इराणमध्ये धुमसणाऱ्या संघर्षाने आता उग्र रूप धारण केले आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांनी इराणची कंबर तोडली आहे. दरम्यान, इराणचे परराष्ट्र मंत्रालय आता चर्चेसाठी तयार असल्याचे सांगत आहे. परंतु, ट्रम्प यांच्या मते, ही चर्चा शांततेसाठी नसून पूर्णपणे बचावासाठी आहे.



डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वर पोस्ट करत इराणला आरसा दाखवला आहे. इराणला आता बोलायचे आहे, पण मी म्हणतो- खूप उशीर झालाय! असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले. ट्रम्प यांची 'नो कॉम्प्रमाइज' भूमिका आणि इराणची डळमळीत झालेली लष्करी ताकद पाहता, आगामी ४८ तास या युद्धाची दिशा ठरवणारे असतील. आता इराण शरणागती पत्करणार की मित्र देशांची मदत घेऊन पुन्हा पलटवार करणार, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

## कापूरहोळ येथील व्यापाऱ्याच्या मुलाचे अपहरण; सर्जिकल नाकाबंदीत सुटका

**पुणे, ता. ४ :** भरदिवसा एखाद्या चित्रपटात शोभाव असा थरार मंगळवारी पुणेकरांनी अनुभवला. भोर तालुक्यातील कापूरहोळ येथील एका नामांकित व्यापाऱ्याच्या १८ वर्षीय मुलाचे अपहरण झाले आणि संपूर्ण पोलीस यंत्रणा कामाला लागली. सुदैवाने, पोलिसांच्या सतर्कतेमुळे अवघ्या काही तासांत मुलाची सुखरूप सुटका करण्यात आली.



मंगळवारची दुपारी कापूरहोळ परिसर नेहमीप्रमाणे गजबजलेला होता. अचानक एका सफेद रंगाच्या एक्सयुव्ही कारमधून काही तरुण आले आणि त्यांनी व्यापाऱ्याच्या मुलाला बळजबरीने गाडीत ओढले. भरवस्तीत झालेलं हे धाडस पाहून परिसरात एकच खळबळ उडाली. कुटुंबीयांनी तत्परता दाखवत पोलिसांना कळवले आणि पोलिसांनी तातडीने तपास सुरु केला.

दरम्यान, जेऊरकडून पिसुर्टीच्या दिशेने जाणारी एक संशयित कार पोलिसांना दिसली. पोलिसांनी पाठलाग सुरू केला. पोलिसांच्या गाड्यांचा सायरन आणि मागे लागलेला ताफा पाहून अपहरणकर्ते पुरते घाबरले. अखेर चालकाचे नियंत्रण सुटले आणि ती एक्सयुव्ही कार थेट रस्त्याकाढच्या उसाच्या दाट शेतात जाऊन घुसली.

कार शेतात अडकताच पोलीस तिथे पोहोचण्यापूर्वीच अपहरणकर्ते गाडी सोडून शेतातून पसार झाले. पोलिसांनी धावत जाऊन गाडी उघडली तेव्हा तो १८ वर्षीय तरुण आत सुरक्षित आढळला. पोलिसांनी त्याला पालकांच्या स्वाधीन केले.

## दहावी-बारावी नंतर सरकार विद्यार्थ्यांचे करणार मोफत करिअर कौन्सिलिंग

**मुंबई, ता. ४ :** दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे ओझे खांद्यावरून उतरले की, विद्यार्थी आणि पालकांसमोर त्यापेक्षाही मोठा प्रश्न उभा ठाकतो, आता पुढे काय? इंजिनीअरिंग, मेडिकल की कॉमर्स? की अजून काही वेगळं? अनेकदा केवळ मित्रांचं पाहून किंवा पालकांच्या आग्रहाखातर चुकीची शाखा निवडली जाते आणि नंतर पश्चात्ताप होतो. हाच गोंधळ दूर करण्यासाठी राज्य शिक्षण विभागाच्या प्रादेशिक विद्या प्राधिकरणाने (मुंबई) एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला असून, विद्यार्थ्यांना आता तज्ज्ञांमार्फत मोफत मानसशास्त्रीय चाचण्या आणि समुपदेशन दिले जाणार आहे.



प्रत्येक विद्यार्थ्याची बौद्धिक क्षमता आणि कल वेगळा असतो. कोणाला गणितात गती असते, तर कोणाची कल्पनाशक्ती कलेच्या क्षेत्रात चांगली असते. केवळ गुणांच्या आधारे करिअर निवडण्याऐवजी, विद्यार्थ्याच्या उपजत गुणांचा शोध घेण्यासाठीमानसशास्त्रीय चाचण्या आणि समुपदेशन अत्यंत प्रभावी ठरतात. खासगी संस्थांकडे या चाचण्यांसाठी हजारो रुपये मोजावे लागतात, मात्र सरकारने ही सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली आहे.

**नोंदणी कशी कराल?**

या सुविधेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना १४ मार्चपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे.

कुठे संपर्क साधाल:प्रादेशिक विद्या प्राधिकरण कार्यालय, एल्फिस्टन टेक्निकल हायस्कूल परिसर, फोर्ट, मुंबई. (सेंट झेवियर कॉलेजजवळ).

आवश्यक कागदपत्रे : परीक्षेच्या हॉल तिकिटाची झेरॉक्स, घरचा पत्ता आणि मोबाईल क्रमांक.

मुलांवर स्वतःच्या इच्छा लादण्यापेक्षा, त्यांच्यातील सुप्त गुण ओळखणे महत्त्वाचे आहे. या उपक्रमात विविध प्रवेश परीक्षा, स्कॉलरशिप आणि नवीन अभ्यासक्रमांची माहितीही मिळणार आहे. त्यामुळे आपल्या पाल्याचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी या संधीचा नक्की फायदा घ्या.

## कतारचा गॅस पुरवठा ठप्प; सामान्यांचे बजेट आता कोलमडणार

**मुंबई, ता. ४ :** पश्चिम आशियातील इस्त्रायल आणि इराणमधील युद्धानंतर भारताला सर्वाधिक गॅस पुरवठा करणाऱ्या कतारने 'फोर्स मेज्योर' घोषित केल्यामुळे देशात नैसर्गिक वायूचा मोठा तुटवडा निर्माण झाला असून, सीएनजी आणि घरगुती गॅसच्या किमती भडकण्याची चिन्हे आहेत.

कतारमधील सर्वात मोठ्या एलएनजी प्रकल्पावर इराणी ड्रोन हल्ला झाल्याने तिथले उत्पादन पूर्णपणे ठप्प झाले आहे. यामुळे कतारने 'अपरिहार्य परिस्थिती' म्हणजेच 'फोर्स मेज्योर' अंतर्गत भारताला होणारा गॅस पुरवठा तूर्तास थांबवला आहे. भारताच्या एकूण एलएनजी आयातीपैकी टक्के हिस्सा एकट्या कतारकडून येतो. त्यामुळे भारतासाठी 'ऊर्जा संकट' निर्माण होण्याची शक्यता आहे.



इराण आणि इस्त्रायलमधील संघर्षामुळे 'होर्मुजची सामुद्रधुनी' हा सागरी मार्ग आता मृत्यूचा सापळा बनला आहे. भारताच्या एकूण आयातीपैकी ५०% तेल याच मार्गाने येते. भारताचा ५४% गॅस पुरवठा या मार्गावर अवलंबून आहे. इराणने या मार्गावर नियंत्रण मिळवल्याने जहाजांचा विमा हप्ता आणि वाहतूक खर्च अनेक पटींनी वाढला आहे, ज्याचा परिणाम किमतींवर झाला आहे.

भारताची प्रमुख कंपनी 'पेट्रोनेट एलएनजी'ने गॅस पुरवठ्यात १० ते ४० टक्क्यांपर्यंत कपात केली असून गाड्यांचे इंधन आणि पाईप गॅसच्या किमती वाढू शकतात. गॅस महागण्याची शक्यता आहे. अनेक गॅस आधारित वीज प्रकल्पांना फटका बसल्याने विजेचे संकट ओढवू शकते.

पुरवठ्यातील ही तूट भरून काढण्यासाठी भारत आता 'स्पॉट मार्केट'मधून महागडा गॅस खरेदी करण्याच्या तयारीत आहे. पण यामुळे पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर ठेवणे सरकारसाठी मोठे आव्हान असेल.

## विधानपरिषद आणि विधानसभा पोटनिवडणुकांची रणधुमाळी सुरू

### पुढील दोन महिन्यांत १६ जागांसाठी निवडणूक

**पुणे, ता. ४ :** महाराष्ट्राच्या राजकारणात येत्या दोन महिन्यांत मोठ्या राजकीय हालचाली पाहायला मिळणार आहेत. राज्याच्या विधिमंडळातील तब्बल  जागा रिक्त होत असून त्या भरण्यासाठी निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. यामध्ये १४ जागा विधानपरिषदेच्या तर २ जागा विधानसभेच्या पोटनिवडणुकीद्वारे भरल्या जाणार आहेत. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी आंतरिक बैठकांचा धडाका लावला असून इच्छुक उमेदवारांनीही लॉबिंगला सुरुवात केली आहे.

विधानपरिषदेसंदर्भात बोलायचे झाल्यास, विधानसभेतून निवडून गेलेल्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपत आहे. या पार्श्वभूमीवर एप्रिलच्या मध्यावर निवडणुकीची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विधानसभेतील संख्याबळाचा विचार करता या निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात चुरस निर्माण होण्याची चिन्हे आहेत. पक्षनिहाय ताकद तपासून उमेदवारी देताना सामाजिक आणि प्रादेशिक समतोल साधण्यावर भर दिला जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

याशिवाय, काँग्रेसमधून राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केलेल्या प्रज्ञा सातव यांच्या रिक्त झालेल्या जागेसाठीही निवडणूक होणार आहे. त्यामुळे या जागेवर कोणाला संधी दिली जाणार याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



स्थानिक स्वराज्य संस्था गटातील पुणे, सोलापूर, सांगली-सातारा आणि रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या चार महत्त्वाच्या मतदारसंघांतील निवडणूक प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाकडून संबंधित मतदारसंघांतील मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण, हरकती व दावे नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासकीय पातळीवर तयारी वेगात सुरू असल्याचे चित्र आहे.

दुसरीकडे, विधानसभेच्या दोन जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. राहुरी मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली आहे. तसेच बारामती मतदारसंघही आमदारांच्या निधनानंतर रिक्त झाला आहे. या दोन्ही मतदारसंघांत पोटनिवडणुकीची प्रक्रिया पार पडणार असून राजकीय वातावरण तापू लागले आहे.

राहुरीमध्ये भाजपकडून अक्षय कर्डिले यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तर बारामतीमध्ये सुनेत्रा पवार यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. दोन्ही ठिकाणी संभाव्य उमेदवारांनी कार्यकर्त्यांच्या बैठका, जनसंपर्क दौरे आणि संघटनात्मक तयारीला सुरुवात केली आहे. सध्या मतदार याद्यांचे पुनरावलोकन, मतदान केंद्रांची तपासणी आणि आवश्यक प्रशासकीय नियोजन युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे येत्या काही आठवड्यांत राज्यातील राजकीय घडामोडींना वेग येणार असून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील राजकीय चढाओढ अधिक तीव्र होणार, हे निश्चित मानले जात आहे.

पुणे प्राईम न्यूज



# अमेरिका व इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात हाय-अलर्ट जारी



**पुणे, ता. ४ :** पश्चिम आशियात अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचला असून, याचे पडसाद आता पुण्याच्या गल्लीबोळांतही उमटू लागले आहेत. इराणचे प्रमुख तसेच सिया पंथाचे धर्मगुरू आयेतुल्ला खामेना यांच्या मृत्यूनंतर जागतिक राजकारणात खळबळ उडाली आहे. याच पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी शहरात 'हाय-अलर्ट' जाहीर केला असून सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे.

पुणे शहरात हजारो इराणी विद्यार्थी शिक्षणासाठी वास्तव्यास आहेत. कोंढवा, कॅम्प आणि खडक यांसारख्या भागांत इराणी नागरिकांची मोठी वस्ती आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर तणाव वाढल्यास त्याचा परिणाम स्थानिक कायदा-सुव्यवस्थेवर होऊ नये, यासाठी पोलिसांनी पावले उचलली आहेत.

केवळ गस्त वाढवून पोलीस थांबलेले नाहीत, तर त्यांनी थेट इराणी विद्यार्थी आणि नागरिकांशी संवाद साधला आहे. सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे व्हिसा मुदतवाढ केली आहे. आपत्कालीन परिस्थितीत मुदतवाढ देण्यासाठी प्रशासनाने सकारात्मकता दर्शवली आहे. या घटनेचे पडसाद म्हणून कोंढवा आणि खडक परिसरात शिया समुदायाकडून शोकसभांचे आयोजन करण्यात आले. या सभेत मोठी गर्दी पाहायला मिळाली. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून संवेदनशील धार्मिक स्थळांवर पोलिसांची नजर आहे.

# 'भोगवटादार वर्ग-२' जमिनीकडे दुर्लक्ष करणे पडेल महागात; नजराणा शुल्काचे काय आहेत नियम?

**पुणे, ता. ४ :** राज्यातील भोगवटादार वर्ग-२ जमिनींच्या व्यवहारांबाबतचा नजराणा शुल्क पुन्हा चर्चेचा विषय ठरला आहे. शेती जमीन अकृषिक करायची असेल, बांधकाम करायचे असेल किंवा जमीन विकायची असेल, तर अशा जमिनींसाठी सरकारची पूर्वपरवानगी आणि मोठ्या रकमेचा नजराणा भरणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. अनेक जमीनधारकांना याची पुरेशी माहिती नसल्याने व्यवहार अडकतात. किंवा थेट दंडाच्या फेऱ्यात सापडतात.





### ही अट का आहे?

वर्ग-२ जमिनी या थेट खाजगी मालमत्ता मानल्या जात नाहीत. बहुतांश वेळा या जमिनी सरकारी मालकीतून, इनाम, वतन किंवा विशिष्ट अटींवर दिलेल्या असतात. त्यामुळे त्यांच्या हस्तांतरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सरकारने परवानगी व नजराणा शुल्काची तरतूद केली आहे. उद्देश एकच अटींवर दिलेल्या जमिनींचा गैरवापर रोखणे.

### नजराणा म्हणजे नेमके काय?

वर्ग-२ जमिनीचा वापर बदलताना (शेती ते एनए) किंवा जमीन विक्री/हस्तांतरण करताना तहसीलदार किंवा जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी घ्यावी लागते. मंजुरीनंतर जमिनीच्या सध्याच्या बाजारभावाच्या साधारण ५० टक्के रक्कम सरकारकडे नजराणा म्हणून भरावी लागते. ही रक्कम भरल्यानंतरच जमीन वर्ग-१ (खाजगी) स्वरूपात रूपांतरित होते.

### बांधकाम करायचे असल्यास?

वर्ग-२ जमिनीवर घर, इमारत किंवा कोणतेही बांधकाम करायचे असल्यास, नजराणा भरल्याशिवाय बांधकाम परवाना मिळत नाही. अर्ज बीपीएमएस किंवा ऑटो डीसीआर प्रणालीतून करता येतो, पण नजराणा न भरल्यास फाईल पुढे सरकत नाही हे अनेकांना उशिरा लक्षात येते.

### नियम तोडल्यास काय होते?

परवानगीशिवाय विक्री किंवा वापर बदल केला, तर तो शर्तभंग ठरतो. अशा प्रकरणात ५० टक्के नजराण्याबरोबरच आणखी ५० टक्के दंड आकारला जाऊ शकतो. म्हणजेच एकूण रक्कम दुप्पट होण्याचा धोका असतो, शिवाय कायदेशीर कारवाईही होऊ शकते.

### हे प्रकरण का महत्त्वाचे?

शहरांच्या वाढीसोबत वर्ग-२ जमिनींच्या किमती झपाट्याने वाढल्या आहेत. माहितीअभावी चुकीचा व्यवहार केल्यास आर्थिक फटका मोठा बसू शकतो. त्यामुळे जमीन खरेदी, विक्री किंवा बांधकामापूर्वी ७/१२ उतारा तपासणे, जमिनीचा वर्ग निश्चित करणे आणि नियमांनुसार परवानगी घेणे हे आता पर्याय नसून गरज बनली आहे.

# दहशतवादी विचारधारेचा प्रसार करणाऱ्या मुंबईतील तीन संशयितांना बेड्या

**मुंबई, ता. ४ :** आखाती देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती तीव्र होत असतानाच, त्याचे पडसाद देशांतर्गत सुरक्षेवरही उमटू लागले आहेत. मुंबईतील काही तरुण इंटरनेटच्या माध्यमातून आयएस आणि इतर दहशतवादी संघटनांच्या संपर्कात असल्याची गंभीर माहिती महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक एटीएस ला मिळाल्यानंतर शहरात खळबळ उडाली आहे. या माहितीच्या आधारे एटीएस ने कुर्ला आणि गोवंडी परिसरातील वस्त्यांमध्ये छापे टाकत मोठी कारवाई केली.

एटीएस गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या इनपुटनुसार, काही तरुण ऑनलाइन माध्यमातून दहशतवादी विचारधारेशी जोडले जात असल्याचे संकेत होते. हे तरुण विदेशात बसलेल्या हँडलर्सच्या संपर्कात असून, सोशल मीडिया, एन्क्रिप्टेड ॲप्स आणि ऑनलाइन चॅनेल्सद्वारे कट्टरतावादी साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोचवले जात होते. या साहित्याच्या माध्यमातून तरुणांची मानसिकता बदलण्याचा आणि देशविरोधी विचार रुजवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे तपासात समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर एटीएस च्या विक्रोळी, काळाचौकी आणि नागपाडा युनिट्सने सोमवारी सायंकाळी संयुक्तपणे कुर्ला आणि गोवंडी भागात छापे टाकले. अनेक तरुणांची चौकशी केल्यानंतर ३ जणांच्या हालचाली संशयास्पद आढळल्या. त्यानंतर या तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्या घरांची झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान मोबाइल फोन, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे हस्तगत करण्यात आली. प्राथमिक तपासात या उपकरणांमध्ये देशविरोधी, भडकावणारे आणि बंदी घातलेल्या संघटनांशी संबंधित ऑनलाइन मजकूर आढळल्याची माहिती सूत्रांनी दिली. या तरुणांचा थेट दहशतवादी कारवायांशी संबंध आहे की ते केवळ ऑनलाइन कट्टरतावादाने प्रभावित झाले आहेत, याचा सखोल तपास सुरू आहे. हस्तगत केलेल्या डिजिटल साधनांच्या फॉरेन्सिक तपासातून आणखी कोणकोण या नेटवर्कशी जोडलेले आहेत, हे उघड होण्याची शक्यता आहे. ही घटना ऑनलाइन कट्टरतावाद हा किती गंभीर धोका ठरू शकतो, याचे स्पष्ट उदाहरण मानली जात आहे.

दरम्यान, आखाती देशांतील युद्धाचा फटका केवळ सुरक्षेपुरता मर्यादित न राहता अर्थव्यवस्थेवरही बसू लागला आहे. मुंबई आणि जवाहरलाल नेहरू बंदर येथून होणारी कृषिमालाची निर्यात जवळपास ठप्प झाली आहे. भारताच्या एकूण कृषी निर्यातीपैकी सुमारे ८० टक्के माल आखाती देशांमध्ये जातो. युद्धस्थिती कायम राहिल्यास येत्या हापूस आंबा हंगामावर मोठे संकट येण्याची भीती निर्यातदार व्यक्त करत आहेत.

एकीकडे अंतर्गत सुरक्षा धोक्यात येण्याची चिन्हे आणि दुसरीकडे आर्थिक फटका या दुहेरी आव्हानांमुळे आखाती युद्धाचे परिणाम महाराष्ट्रासाठी अधिक गंभीर ठरत असल्याचे चित्र सध्या स्पष्ट होत आहे.

# मिसिंग लिंक प्रकल्पाबाबत राज्य सरकारचा अधिक सावध पवित्रा

**पुणे, ता. ४ :** पुणे-मुंबई प्रवासातील कायमची कोंडी कमी करण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या मिसिंग लिंक प्रकल्पाबाबत राज्य सरकारने अधिक सावध पवित्रा घेतला आहे. पहिल्या टप्प्यात या नव्या मार्गावर केवळ हलक्या वाहनांनाच प्रवेश देण्याचा निर्णय जवळपास निश्चित झाला असून, ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या जड वाहनांना सध्या तरी परवानगी देण्यात येणार नाही. हा प्रस्ताव राज्य रस्ते विकास महामंडळ च्या विचाराधीन असून, प्रवाशांची सुरक्षितता आणि वाहतूक सुरळीत ठेवणे हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे.

सध्या पुणे-मुंबई द्रुतगती महामार्ग वर होणारी वाहतूक कोंडी ही प्रवाशांसाठी नित्याचीच समस्या बनली आहे. विशेषतः ज्वलनशील पदार्थांचे टँकर बंद पडले, अपघातग्रस्त झाले किंवा उलटले, तर संपूर्ण महामार्ग तासन्तास ठप्प होतो. काही आठवड्यांपूर्वी प्रोपिलीनचा एक टँकर उलटल्यानंतर तो हटवण्यासाठी तब्बल ३० ते ३२ तास लागले होते. या काळात हजारो वाहनचालक आणि प्रवाशांना अक्षरशः महामार्गावर अडकून राहावे लागले. या घटनेनंतर महामार्गाच्या नियोजनावर तीव्र टीका झाली होती.

याच पार्श्वभूमीवर मिसिंग लिंकवर अशीच परिस्थिती उद्भवू नये, यासाठी एमएसआरडीसी ने आधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या १ मेपासून हा मार्ग खुला करण्याचे नियोजन आहे. मात्र, सुरुवातीचे किमान ६ महिने हा मार्ग हलक्या वाहनांसाठीच खुला ठेवण्याचा प्रस्ताव आहे. कार, जीप आणि खासगी प्रवासी वाहने यांनाच प्राधान्य दिले जाणार असून, ज्वलनशील पदार्थ वाहून नेणारे टँकर किंवा जड वाहने या टप्प्यात वर्ज्य असतील.

या निर्णयामागे काही सामाजिक संस्था आणि मान्यवरांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेली विनंतीही कारणीभूत ठरल्याचे सांगितले जाते. नव्या मार्गाचा आनंद प्रवाशांना सुरक्षितपणे घेऊ द्या, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. त्यानंतर या संदर्भातील सूचना एमएसआरडीसी अधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती आहे.

पहिल्या ६ महिन्यांत या मार्गावरील वाहतुकीचा ताण, प्रवाशांचे अनुभव, संभाव्य अडथळे आणि सुरक्षिततेचे मुद्दे यांचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे. एप्रिल महिन्यात या मार्गावर चाचणी धावण्या घेतल्या जाणार असून, त्यानंतर मे महिन्यात अधिकृत उद्घाटन होण्याची शक्यता आहे. मात्र, काही तांत्रिक कामांमुळे १ मेचा मुहूर्त थोडा पुढे ढकलला जाण्याची शक्यताही अधिकाऱ्यांनी सूचकपणे व्यक्त केली आहे. एकंदरीत, मिसिंग लिंक हा प्रकल्प केवळ अंतर कमी करणारा नसून, योग्य नियोजन केल्यास तो पुणे- मुंबई प्रवासातील ताण आणि अपघातांचा धोका कमी करणारा ठरू शकतो. आणि म्हणूनच सुरुवातीची ही खबरदारी महत्त्वाची मानली जात आहे.







Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# भिगवण शहरात मॉडिफाईड सायलेन्सरचा सुळसुळाट; कर्णकर्कश आवाजामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. ४ : शहरात सध्या मॉडिफाईड सायलेन्सर बसवलेल्या दुचाकींचा त्रास असह्य झाला आहे. चौकाचौकातून वेगाने गाड्या पळवत अचानक फटाकड्यासारखे मोठे आवाज काढण्याचे प्रकार वाढले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निमर्ण झाले आहे. विशेषतः बाजारपेठ, शाळाकॉलेज परिसर आणि मुख्य रस्त्यांवर हा प्रकार वारंवार घडत असल्याने लहान मुले, महिला व जेष्ठ नागरिक दचकून घाबरत आहेत.

अनेक ठिकाणी अल्पवयीन मुलांच्या हाती दुचाकी दिसत असून, मूळ कंपनीने दिलेल्या सायलेन्सरऐवजी जाणीवपूर्वक मोठा आवाज करणारे मॉडिफाईड सायलेन्सर बसवले जात आहेत. वेगमर्यादा न पाळणे, ट्रिपल सीट फिरणे आणि मुद्दाम बार काढणे ही काही तरुणांची हौस बनली आहे. मात्र या हौसेचा फटका संपूर्ण शहराला बसत आहे. आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, अचानक होणारा मोठा आवाज हा केवळ त्रासदायक नसून आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो.



**हृदयविकाराच्या रुग्णांवर परिणाम**

अचानक होणाऱ्या कर्णकर्कश आवाजामुळे हृदयाचे ठोके झपाट्याने वाढू शकतात. हृदयविकाराचा त्रास असलेल्या रुग्णांना छातीत धडधड, घाबरल्यासारखे वाटणे, श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे जाणवू शकतात. तीव्र भीतीमुळे हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढू शकतो.

**उच्च रक्तदाब (ब्लड प्रेशर)**

असलेल्या रुग्णांवर परिणाम मोठ्या आवाजामुळे शरीरात ताण निर्माण होतो व रक्तदाब अचानक वाढू शकतो. आधीच उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींमध्ये डोकेदुखी, चक्कर येणे, अस्वस्थता वाढू शकते. वारंवार ताण आल्यास दीर्घकालीन आरोग्य बिघडण्याची शक्यता असते.

**लहान मुले व जेष्ठ नागरिक**

अचानक आवाजामुळे मुले दचकतात, रडू लागतात, मानसिक भीती निर्माण होते. जेष्ठ नागरिकांमध्ये तोल जाणे, हृदयाचे ठोके वाढणे, घाबरून पडण्याचे प्रकार घडू शकतात.

**मानसिक आरोग्यावर परिणाम**

वारंवार होणारा आवाज हा चिडचिड, झोप न लागणे, एकाग्रता कमी होणे यांस कारणीभूत ठरतो. व्यापारी व विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कामावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.


**कायदेशीर तरतुदी काय सांगतात?**

१) मोटार वाहन कायदा, १९८८ कलम ५२ : वाहनाच्या मूळ रचनेत अनधिकृत बदल करणे दंडनीय आहे. कंपनीकडून बसवलेला सायलेन्सर काढून मॉडिफाईड, मोठा आवाज करणारा सायलेन्सर बसवणे या कलमान्वये गुन्हा ठरतो.

२) मोटार वाहन कायदा कलम १९९ ए : अल्पवयीन व्यक्ती वाहन चालवताना आढळल्यास वाहनमालक/पालक जबाबदार धरले जातात. २५,००० पर्यंत दंड, वाहन नोंदणी निलंबन आणि अल्पवयीनास परवाना नाकारण्याची तरतूद.

नागरिकांची ठाम मागणी भिगवणमध्ये विशेष तपासणी मोहीम राबवून मॉडिफाईड सायलेन्सर जप्त करावेत, अल्पवयीन दुचाकीस्वारांवर कठोर कारवाई करावी आणि बाजारपेठ-शाळा परिसरात नियमित गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. भिगवण पोलीस प्रशासनाने वेळीच लगाम न घातल्यास हा फटाक्यांचा सुळसुळाट भविष्यात गंभीर परिणाम घडवू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

प्राईम लाईफ




## मानसिक ताण कमी करण्यासाठी करा हे सोपे बदल

आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात मानसिक ताण किंवा स्ट्रेस ही एक गंभीर समस्या बनली आहे. कामाचा ताण, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि भविष्याची चिंता यामुळे लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकजण मानसिक दबावाखाली वावरत आहे. मात्र, तज्ज्ञांच्या मते, छोट्या-छोट्या सवयी बदलल्यास आपण या ताणातून सहज बाहेर पडू शकतो. मानसिक ताण कमी करण्यासाठी काही महत्त्वाचे आणि प्रभावी मार्ग खालीलप्रमाणे आहेत.

पुरेसी झोप घ्या : मानसिक आरोग्यासाठी शांत झोप अत्यंत आवश्यक आहे. दिवसातून किमान ७ ते ८ तास झोप घेतल्याने मेंदूला विश्रांती मिळते आणि दुसऱ्या दिवशी कामात उत्साह जाणवतो. झोप पूर्ण न झाल्यास चिडचिड वाढते आणि ताण अधिक जाणवतो.

व्यायामाला प्राधान्य द्या : व्यायाम केल्याने शरीरात एंडॉर्फिन नावाचे हॅप्पी हार्मोन्स तयार होतात, जे नैसर्गिकरित्या ताण कमी करतात. दिवसातून फक्त २० ३० मिनिटे चालणे, धावणे किंवा योगासने केल्याने मनाला प्रसन्नता मिळते.

प्राणायाम आणि ध्यान : दिवसभरातून किमान १० मिनिटे शांत बसून दीर्घ श्वास घेण्याचा सराव करा. ध्यानामुळे विचारांची गर्दी कमी होते आणि मन एकाग्र व्हायला मदत होते.

छंद जोपासा : कामाच्या गडबडीत आपण स्वतःला विसरतो. आवडीचे गाणे ऐकणे, वाचन करणे, चित्रकला किंवा बागकाम करणे यामुळे मेंदूला रिलॅक्स होण्यासाठी वेळ मिळतो.

स्क्रीन टाईम कमी करा : झोपण्यापूर्वी किमान एक तास मोबाईल किंवा लॅपटॉप बाजूला ठेवा. सोशल मीडियावरील सततची माहिती आणि इतरांच्या आयुष्याशी केलेली तुलना मानसिक ताण वाढवण्यास कारणीभूत ठरते.

मनमोकळेपणाने बोला : अनेकदा आपण मनातल्या गोष्टी मनातच दाबून ठेवतो. आपल्या जवळच्या मित्रांशी किंवा कुटुंबातील सदस्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधा. बोलल्याने मनावरचा अर्धा भार हलका होतो.

आहार आणि पाणी : जास्त प्रमाणात चहा किंवा कॉफी (कॅफिन) घेणे टाळा. संतुलित आहार आणि भरपूर पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेटेड राहते आणि त्याचा सकारात्मक परिणाम मनावर होतो.

तज्ज्ञांचा सल्ला: जर तुम्हाला सतत उदास वाटत असेल किंवा ताण असह्य होत असेल, तर वेळीच मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घेण्यास कचरू नका. शारीरिक आजाराप्रमाणेच मानसिक आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे.

# दुबईत १० पर्यटकांचा जीव टांगणीला; 'सरकार पाठीशी आहे : एकनाथ शिंदे

**पुणे, ता. ४ :** पुण्यातील दहा मित्रांची दुबई सहल युद्धजन्य परिस्थितीमुळे अचानक अडचणीत सापडली. नियोजित सुट्टीसाठी गेलेले हे सर्वजण परतीच्या वेळी विमानसेवा विस्कळीत झाल्याने दुबईतच अडकून पडले. मात्र ही बाब राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पोहोचताच, त्यांनी थेट हस्तक्षेप करत या सर्वांना मोठा दिलासा दिला.

ही मंडळी २४ फेब्रुवारी रोजी पुण्यातून दुबईला रवाना झाली होती. २८ फेब्रुवारीपर्यंत सहलीचा बेत होता आणि १ मार्च रोजी परतीचे विमान निश्चित होते. किशोर कुलकर्णी यांनी सांगितले की, सहलीदरम्यान ते अबुधाबी येथील फरारी वर्ल्डयेथे गेले असताना अचानक स्फोटासारखे



आवाज ऐकू आले. परिसरात ड्रोन उडताना दिसल्याने वातावरण तणावपूर्ण झाले. या पार्श्वभूमीवर मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षामुळे काही विमानसेवा रद्द किंवा पुढे ढकलण्यात आल्या.

यानंतर हे सर्व मित्र दुबई विमानतळावर पोहोचले. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव त्यांना विमानतळात प्रवेश देण्यात आला नाही. टूर मॅनेजरच्या मदतीने तात्पुरती हॉटेल व्यवस्था करण्यात आली, पण पुढे काय होणार याबाबत अनिश्चितता कायम होती. परदेशात अडकून पडल्याची चिंता कुटुंबीयांसाठीही मोठी होती.

दरम्यान, पुण्यातील मित्र आणि ओळखीच्या व्यक्तींमार्फत ही माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पोहोचली. शिंदे यांनी थेट फोन करून सर्व दहा जणांशी संवाद साधला, परिस्थितीची माहिती घेतली आणि सरकार तुमच्या पाठीशी आहे असा धीर दिला. इतकेच नव्हे, तर दुबईत कार्यरत असलेले डॉ. संजय दैठणकर यांना प्रत्यक्ष भेटीसाठी पाठवण्यात आले. डॉ. दैठणकर हे महाराष्ट्र मंडळांशी जोडलेले असून त्यांनी स्थानिक पातळीवर मदतीचा समन्वय साधला.

या गटात किशोर कुलकर्णी, चेतन सोहनी, सिद्धेश्वर जाधव, प्रवीण भांड, विशाल भोसले, अजय काळे, रोहित आल्हाट, गणेश गुळवे, प्रकाश गवळी आणि संदीप उकरंडे यांचा समावेश आहे. परदेशात आपत्तीजन्य परिस्थितीत अडकलेल्या नागरिकांना प्रशासनाने वेळेवर दिलेली मदत किती महत्त्वाची असते, हे या घटनेतून स्पष्ट होते. वाढत्या आंतरराष्ट्रीय तणावाच्या पार्श्वभूमीवर प्रवास करताना सतर्कता, प्रवास विमा आणि स्थानिक दूतावासाशी संपर्काची माहिती असणे किती आवश्यक आहे, हेही या घटनेने अधोरेखित केले आहे.

# 'महिला महाराष्ट्र केसरी' स्पर्धा सोलापूरात रंगणार

**सोलापूर, ता. ४ :** महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीत कुस्तीला महत्त्व आहे. पुरुषांच्या कुस्तीइतकीच आता महिलांची कुस्तीही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असून, यंदाची 'चौथी महिला महाराष्ट्र केसरी' स्पर्धा सोलापूरात रंगणार आहे. येत्या २८ आणि २९ मार्च रोजी सिद्धेश्वर पेठ येथील हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर हा कुस्तीचा महासंग्राम पाहायला मिळेल.

सोलापुरातील निर्झरा केअर फाऊंडेशनकडे स्पर्धेचे यजमानपद सोपवण्यात आले आहे. ज्येष्ठ कुस्तीपटू आणि पोलीस अधिकारी दिवंगत सिद्धाराम साखरे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या कन्या स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. राज्यातील ४२ जिल्ह्यांतून सुमारे ४०० हून अधिक महिला या स्पर्धेत आपली ताकद अजमावतील.



यामध्ये सर्वांच्या नजरा तीन वेळा 'महाराष्ट्र केसरी' ठरलेल्या भाग्यश्री फंड हिच्यावर खिळल्या आहेत.

ही स्पर्धा एकूण १० वजनी गटांत (५० किलो ते ७६ किलो) पार पडणार आहे. प्रत्येक गटातील अव्वल तीन विजेत्यांना पदके मिळतीलच, पण सर्वांचे आकर्षण असलेल्या 'महाराष्ट्र केसरी' किताब पटकावणाऱ्या महिला मल्लाला मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे.

# लोखंडी गेट अंगावर कोसळून अडीच वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू

**सातारा, ता. ४ :** कराड येथे होळीच्या दिवशी घडलेल्या दुर्दैवी अपघातात अडीच वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला. घराचे लोखंडी प्रवेशद्वार अंगावर कोसळल्याने ही दुर्घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



कराड शहरातील भोई गल्ली येथे वल्लभ मुळे यांचा मासे पकडण्याच्या जाळी विक्रीचा व्यवसाय आहे. ते कुटुंबासह मलकापूर परिसरात राहतात. होळीच्या दिवशी रात्री ते पत्नी आणि मुलगा विघ्नेश याच्यासह घरी परतले. घरासमोर दुचाकी थांबवून विघ्नेश आत जात असताना अचानक लोखंडी प्रवेशद्वार त्याच्या अंगावर कोसळले. या घटनेत तो गंभीर जखमी झाला.

प्रवेशद्वार पडल्याचे पाहताच वडील वल्लभ मुळे यांनी तातडीने मुलाला उचलले. शेजाऱ्यांच्या मदतीने त्याला कराड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. ही बातमी ऐकताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

घटनेची माहिती मिळताच नातेवाईक आणि समाजातील लोकांनी रुग्णालयात गर्दी केली. मंगळवारी सकाळी कराड येथील वैकुंठ स्मशानभूमीत विघ्नेशवर अंत्यसंस्कार करण्यात आले. कुटुंबात आई-वडिलांसह एक मुलगी असून, मुलाच्या निधनामुळे घरात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर शोकाकुल झाला आहे.

# विनोद तावडेंसह रामदास आठवले राज्यसभेवर जाणार

**मुंबई, ता. ४ :** राज्यसभेसाठी भारतीय जनता पक्षाने आपल्या उमेदवारांची नावे जाहीर करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. भाजपने विनोद तावडे, रामदास आठवले, माया ईवनाते आणि रामराव वडकुते यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. या निवडीतून भाजपने आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून या बड्या नेत्यांना संधी दिल्याचे स्पष्ट होते.

भाजपकडे सध्या १३२ आमदारांचे संख्याबळ असून २५ नावांमधून केंद्राने ४ जणांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यांच्या तीन जागा सहज निवडून येऊ शकतात, तर चौथ्या जागेसाठी मित्रपक्षांची मदत लागणार आहे.

विनोद तावडे : तावडेंना संसदेत पाठवून भाजपने त्यांच्या अनुभवाचा सन्मान केला आहे.



रामदास आठवले : दलित मतांचे समीकरण आणि मित्रपक्षाला सोबत ठेवण्यासाठी आठवलेंची उमेदवारी महत्त्वाची मानली जाते.

माया ईवनाते : नागपूरच्या माजी महापौर आणि भाजपचा आदिवासी चेहरा असलेल्या ईवनाते यांना संधी देऊन विदर्भातील आदिवासी मतांवर पकड मिळवण्याचा हा प्रयत्न आहे.

रामराव वडकुते : धनगर समाजाचे नेतृत्व करणारे वडकुते यांना उमेदवारी देऊन पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील ओबीसी मतदारांना साद घालण्यात आली आहे.

दुसरीकडे, महाविकास आघाडी मध्ये पेच कायम होता. शरद पवार स्वतः राज्यसभेसाठी इच्छुक असताना शिवसेनेने (ऊबाठा) या जागेवर दावा केला होता. सूत्रांच्या माहितीनुसार, चर्चेनंतर अखेर शिवसेनेने शरद पवारांना पाठिंबा देत एकी दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

# दोन देशांच्या रडारवर होतं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं विमान!

**मुंबई, ता. ४ :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या आरोप-प्रत्यारोपांच्या तोफा डागल्या जात असतानाच, आमदार रोहित पवार यांनी एका जुन्या प्रकरणाचा 'बॉम्ब' टाकला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दावोस दौऱ्या दरम्यान त्यांचा विमान प्रवास किती थरारक आणि जीवघेणा ठरला होता, याचा खळबळजनक गौप्यस्फोट पवारांनी मुंबईतील पत्रकार परिषदेत केला.

रोहित पवारांच्या दाव्यानुसार, जेव्हा एकनाथ शिंदे दावोसला (स्वित्झर्लंड) जात होते, तेव्हा त्यांच्या विमानाचा 'फ्लाईट प्लॅन' कमालीचा गोंधळलेला होता. आंतरराष्ट्रीय नियमांनुसार कोणत्याही देशाच्या हवाई हद्दीतून जाताना पूर्वपरवानगी आवश्यक असते. मात्र, शिंदेंचे विमान जेव्हा इराणच्या हद्दीत शिरले, तेव्हा



तिथल्या हवाई नियंत्रण कक्षाने थेट इशारा दिला की, तुमचा फ्लाईट प्लॅन आमच्या रेकॉर्डमध्ये नाही, विमानाचा मार्ग आत्ताच्या आत्ता बदला, अन्यथा आम्ही विमान पाडू!

इराणच्या इशाऱ्यानंतर वैमानिकाने विमान इराकच्या दिशेने वळवले, पण तिथेही परिस्थिती बदलली नाही. इराकनेही परवानगी नसल्याचे सांगत विमान पाडण्याची धमकी दिली. हा केवळ तांत्रिक बिघाड नसून एका राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांचा जीव धोक्यात घालण्याचा प्रकार होता. अखेर हे विमान 'बहरीन'ला उतरवण्यात आले आणि तिथून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पुढील प्रवास झाला.

रोहित पवारांनी या प्रकरणाचे धागेदोरे व्हीसीआर कंपनीशी जोडले आहेत. एका उपमुख्यमंत्र्यांचे विमान दोन देश पाडण्याची धमकी देतात, हे सामान्य नाही. हा घातपाताचा प्रयत्न होता का? असा सवाल करत त्यांनी सत्तेतील नेत्यांच्या सुरक्षेवर बोट ठेवले आहे.

# वसतिगृहात विद्यार्थ्यांकडूनच विद्यार्थ्यांवर अनैतिक कृत्य

**नाशिक, ता. ४ :** नाशिकमधील समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून इतर लहान विद्यार्थ्यांसोबत गैरवर्तन झाल्याचा खळबळजनक आरोप समोर आला आहे. या धक्कादायक प्रकारामुळे वसतिगृहातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पालकांमध्ये भीतीचे तर स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दहावीतील काही विद्यार्थ्यांनी ५ वी ते ७ वीतील विद्यार्थ्यांवर अनैतिक कृत्य केल्याचा आरोप आहे. संबंधित विद्यार्थ्यांना गुंगीचे औषध किंवा मद्य दिल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. पीडित विद्यार्थ्यांनी ही बाब आपल्या पालकांना सांगितल्यानंतर हा प्रकार उघड झाला. त्यानंतर संतप्त पालकांनी इगतपुरी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

पालकांच्या म्हणण्यानुसार, वसतिगृह प्रशासनाकडून योग्य देखरेख न झाल्यामुळे हा प्रकार घडला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. तसेच तक्रार नोंदवताना पोलिसांकडून विलंब होत असल्याची तक्रार काही पालकांनी केली आहे. मात्र पोलिसांकडून या संदर्भात तपास सुरू असल्याचे सांगितले जात आहे.


या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कडक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. प्रकरणाचा पुढील तपास इगतपुरी पोलीस स्टेशनकरत आहेत.

# विमानतळावर जाण्यासाठी ट्रॉफिक-मधून सुटकेसाठी आता नवीन प्लॅन

**पुणे, ता. ४ :** पुण्याच्या लोहगाव विमानतळ पर्यंत थेट मेट्रोने जाण्याचे स्वप्न आता कागदावरून प्रत्यक्षात उतरण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पुढे गेले आहे. सध्या सुरू असलेल्या वनाझ -रामवाडी मेट्रो मार्गिकेचा विस्तार कल्याणीनगर मार्गे विमानतळापर्यंत करण्याचा व्यवहार्य पर्याय निश्चित करण्यात आला असून, यासाठीचा सविस्तर प्रकल्प आराखडा लवकरच तयार केला जाणार आहे.

केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत मेट्रो विमानतळापर्यंत नेण्यासाठी मांडण्यात आलेल्या ६ पर्यायांवर सविस्तर चर्चा झाली. अखेर कल्याणीनगर येथील सध्याच्या मेट्रो स्थानकापुढून स्पर लाईनद्वारे विमानतळापर्यंत मेट्रो नेण्याचा पर्याय सर्वात व्यवहार्य असल्याचे स्पष्ट झाले. यालाच सर्व लोकप्रतिनिधींचा पाठिंबा मिळाल्याचे मोहोळ यांनी सांगितले.

सध्या वनाझ ते रामवाडी ही मेट्रो मार्गिका कार्यरत आहे. पुढील टप्प्यात रामवाडी ते वाघोली-विठ्ठलवाडीपर्यंत विस्तार नियोजित आहे. मात्र, शहराचा हवाई प्रवासासाठी महत्त्वाचा असलेला लोहगाव विमानतळ मेट्रो नेटवर्कपासून दूर असल्याने प्रवाशांना रिक्षा, बस किंवा खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. हीच




गैरसोय दूर करण्यासाठी विमानतळ जोडणीचा DPR तयार करण्याचे निर्देश यापूर्वीच देण्यात आले होते.

या बैठकीत महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सादरीकरण केले. त्यानुसार, कल्याणीनगरसिम्बायोसिस कॉलेज-एरोमॉल असा मार्ग निवडल्यास कमीत कमी भूसंपादन लागेल. संरक्षण मंत्रालयाच्या हद्दीतील जागा टाळून केवळ विद्यमान रस्त्यांवरून मेट्रो नेण्याचा पर्याय असल्याने परवानग्या मिळण्याची प्रक्रियाही जलद होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, शहराच्या वाढत्या विस्ताराचा विचार करता शेवाळेवाडी ते कात्रज-वाकड फाटा दरम्यान महामार्गालगत मेट्रो विकसित करण्याचाही विचार सुरू आहे. वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या दोन मार्गिकांची कामेही लवकरच सुरू होण्याचा दावा करण्यात आला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास पुणे शहराला पहिल्यांदाच थेट मेट्रो विमानतळ जोडणी मिळेल. त्यामुळे प्रवाशांचा वेळ, खर्च आणि वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. पुण्याच्या सार्वजनिक वाहतुकीच्या इतिहासातील हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.